# जालना शहर महानगरपालिका,जालना

प्रशासकीय ईमारत,गांधी चौक ते रेल्वेस्टेशन रोड,

जुना जालना,जालना ४३१२०३

जा.क्र./जाशमपा/मा.वि./2026/799 दि.31 /08/2026

**जाहीर प्रगटन / निविदा सुचना**

**स्वारस्य प्रकटीकरण**

**(Expression of Interest)**

जालना शहर महानगरपालिका जालना मा.सर्वसाधारण सभा दिनांक 14/07/2026,ठराव क्र.(22) अन्वये जालना शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व विद्युत डी.पी.ना संरक्षण भिंत / संरक्षण कुंपन बांधकाम करून घेणे व त्या बदल्यात सदरील संरक्षण भिंत / संरक्षण कुंपनावर जाहीरात प्रसिध्द करण्याचे अधिकार संबंधित संस्था / एजन्सी यांना प्रदान करणेसाठी या क्षेत्रात काम करणा-या अनुभवी संस्था / एजन्सी यांचे कडून स्वारस्य प्रकटीकरण (EOI) ( **Expression of Interest** ) अंतर्गत प्रस्ताव मागविण्यास अनुमती प्रदान करण्यात आली आहे.

त्यानुसार वरील प्रमाणे काम करण्याकरिता सर्व इच्छुक व स्वारस्य असलेल्या अनुभवी संस्था /एजन्सीधारकांकडून जालना शहर हद्दीतील विद्युत डी.पी.ना संरक्षण भिंत / संरक्षण कुंपन बांधकाम करून घेणे व त्या बदल्यात सदरील संरक्षण भिंत / संरक्षण कुंपनावर जाहीरात प्रसिध्द करण्याचे अधिकार संबंधित संस्था / एजन्सी यांना प्रदान करणेसाठी या क्षेत्रात काम करणा-या अनुभवी संस्था / एजन्सी यांचे कडून व्दिलिफाफा पध्दतीने निविदा /दरपत्रके मागविण्यात येत आहे. ज्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

1) जालना शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्र / हद्दीतील विद्युत डी.पी.ना संरक्षण भिंत / संरक्षण कुंपन बांधकाम करून त्यावर जाहिरात प्रसिध्द करणे अपेक्षित आहे.
2) सदर कामाची कोरी निविदा जाहिरात प्रदर्शित झाल्याच्या दि.02/09/2026 पासुन ते दि.09/09/2026 रोजी दुपारी 03.00 वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागात रोख रक्कम रु.5000/- चा भरणा करून मिळेल.
3) सदर भरलेल्या निविदा सादर करण्याचा अंतिम दि.09/09/2026 रोजी दुपारी 03.00 वाजेपर्यंत राहील.
4) सदरील भरलेल्या निविदा मालमत्ता विभागात दुपारी 03.00 वाजेपर्यंत द्विलिफाफा पध्दतीने सादर करण्यात याव्यात.
5) सदर निविदा शक्यतो त्याच दिवशी अथवा मा.आयुक्त महोदय यांच्या आदेशानुसार यथावकाश उघडण्यात येतील.
6) निविदेच्या कामाची अधिक माहिती तसेच अटी व शर्ती मालमत्ता विभागात उपलब्ध आहे.
7) संदरची निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचे संपूर्ण आधिकार जालना शहर महानगरपालिका ने राखून ठेवले आहेत.

**स्वाक्षरीत /-**
**अंजली शर्मा (भा.प्र.से.)**
**आयुक्त**
**जालना शहर महानगरपालिका**
**जालना.**

## निविदा सादर करावयाची पध्दत

**लिफ़ाफ़ा क्र.1**
या भागात निविदेची तांत्रिक माहिती :
निविदा अटीचे पुष्टीकरणार्थ आवश्यक कागदपत्रे इत्यादीचा समावेश आहे. यामध्ये खालील नमूद केलेली कागदपत्रे सादर करणे आनिवार्य राहील.

1. एजन्सीचे नोंदणी प्रमाणपत्र, पॅन / टॅन क्रमाक, GST प्रमाणपत्र.
2. अनामत रक्कम रू.10,000/- चा मा.आयुक्त जालना शहर महानगरपालिका जालना यांचे नांवे देय असणारा धनाकर्ष / डी.डी.जमा करावा
3. निविदा प्रक्रियेत भाग घेणाऱ्या एजन्सीचे इतर भागीदार / संचालक इत्यादी यांचे शपथपत्र जोडणे आवश्यक राहील.
4. या क्षेत्रात काम केल्याचे कार्यादेश जोडणे आवश्यक आहे.
5. इच्छुक एजन्सीधारकास या क्षेत्राचा किमान 3 वर्षाचा अनुभव असणे आवश्यक राहील. त्यासाठी अनुभव प्रमाणपत्र व आवश्यक कागदपत्रे सोबत जोडणे आवश्यक राहील.
6. इच्छुक एजन्सीधारक यांनी अद्यावत GST नोंदणी प्रमाणपत्राच्या प्रती सादर करणे आवश्यक राहील.
7. मागील 3 वर्षाचे आयकर परतावा भरल्याची कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.
8. निविदा प्रक्रियेत भाग घेणाऱ्या एजन्सीचे इतर भागीदार / संचालक यांचे कुलमुख्त्यारपत्र (जी.पी.ए.) जोडणे आवश्यक राहील.
9. एजन्सीधारक यांचे सनदी लेखापाल (C.A) यांचे मार्फत प्रमाणित केलेले UDIN / Balance Sheet जोडणे आवश्यक आहे.

**लिफाफा क्र.2**
या लिफाफ्यात निविदा दरपत्रक असावेत. दरपत्रकात सुवाच्च अक्षराने दर भरलेले असावेत.

**अटी व शर्ती:**
1. एजन्सीधारकाने किमान 2 महानगरपालिकेकडून त्यांच्या जाहीरात धोरणांची माहिती घेऊन तेथील जाहीरात धोरणांचे अटी व शर्ती महापालिकेस पुरविणे बंधनकारक राहील.
3. निविदा स्विकारणे,अंशतः स्विकारणे अथवा कोणतेही कारण न देता निविदा पुर्णपणे नाकारण्याचा अधिकार हा मा.आयुक्त जालना शहर महानगरपालिका जालना यांनी राखुन ठेवला आहे.
4. इच्छुक एजन्सीधारकास या क्षेत्राचा किमान 3 वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. त्यासाठी अनुभव प्रमाणपत्र व इतर अनुषंगिक कागदपत्र सोबत जोडणे बंधनकारक राहील.
5. एजन्सीची मागील 3 वर्षात वार्षिक उलाढाल सरासरी किमान रु.एक कोटी असणे आवश्यक आहे.

**टिप :- लिफाफे सादर करतांना, लिफाफा क्रमांक 1 व 2 असे स्पष्ट लिहुन, दोन्ही लिफाफे एका बंद पाकीटात सादर करण्यात यावीत.**

**स्वाक्षरीत/-**
**अंजली शर्मा (भा.प्र.से.)**
**आयुक्त**
**जालना शहर महानगरपालिका**
**जालना.**